स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

" महाराष्ट्र विधिमंडळात मराठवाड्यातील महिला सदस्यांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास "

(सन 2004-2019)

मानव्य विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठास सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक

सरस्वती रावसाहेब कदम

(एम.ए. राज्यशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे

एम. ए. पीएच. डी

(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

श्री मधुकरराव बापुराव पाटिल खतगावकर, महाविद्यालय

शंकरनगर ता बिलोली जि. नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज नांदेड

राज्यशास्त्र विभाग,

जुलै 2023

" महाराष्ट्र विधिमंडळात मराठवाड्यातील महिला सदस्यांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास " (सन 2004-2019)

प्रस्तावना

स्वतंत्र भारताने सार्वत्रिक मताधिकारावर आधारित संसदीय लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारली. लोकशाहीत मतदारांनी मतपेटी द्वारा व्यक्त निर्णयानुसार सत्ताधारी ठरत असतात. लोकशाहीचे यश राजकारणात सर्वसामान्यांच्या वाढत्या सहभागावर अवलंबून असते. त्यामुळे लोकशाहीत राजकीय सहभागाला अतिशय महत्त्व आहे. राजकीय सहभागीत्व म्हणजे लोकांनी राजकारणात क्रियाशील असणे. राजकीय सहभागीत्व मतदान करणे या प्राथमिक स्वरूपाच्या कार्यापासून प्रत्यक्ष पक्षीय राजकारणात भाग घेऊन निवडणुकीच्या माध्यमातून सत्ता पदे प्राप्त करणे, लोकप्रतिनिधी म्हणून शासनाच्या ध्येय धोरण निर्मितीच्या प्रक्रियेत सहभागी होण्यापर्यंत व्यापक स्वरूपाचे असते.

तात्विक दृष्ट्या लोकशाही राष्ट्रात प्रत्येक नागरिकाला देशाच्या राजकारणात सक्रिय भाग घेण्याचा, सत्ता संपादनाचा अधिकार हा स्वभाव सिद्ध आहे प्रत्येकाला सत्तेचा इच्छुक असणे, निवडणुका लढवण्याचा व त्या जिंकण्याचा अधिकार आहे

केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगातील बहुतांश देशात समाजातील महिला वर्ग अनेक वर्षापासून सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनापासून वंचित राहिला आहे. भारतीय राज्यघटनेने स्त्री पुरुष समानता हे तत्व मान्य केल्यामुळे लिंग आधारित भेदभाव संपूर्णतः नष्ट झाला असे चित्र नाही. मात्र सार्वत्रिक मताधिकाऱ्यामुळे समाजातील आजवर सत्तेपासून, दूर राहिलेल्या स्त्रियांना राजकारणात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली.

संसदीय लोकशाहीच्या जननी म्हणून ओळख असलेल्या इंग्लंडमध्ये महिलांना संसदेचे सभासदत्व व मताधिकार मिळायला जवळजवळ सहाशे वर्षे लागली. आपल्या देशात महात्मा गांधीच्या अभूतपूर्व नेतृत्वामुळे महिलांना स्वातंत्र्य चळवळीत आपले कर्तृत्व दाखविण्याची संधी तर मिळालीच पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार मिळाला.

स्वातंत्र्योत्तर काळात संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून स्त्रियांचा राजकारणात शिरकाव होऊ लागला. पण संसद, राज्याची विधीमंडळे, केंद्रीय व राज्य मंत्रिमंडळात स्त्रियांची संख्या नगण्य राहिली आहे. सन 1952 ते 2019 या कालावधीत लोकसभेतील महिला सदस्यांचे प्रमाण सरासरी 6.15 % तर राज्यसभेतील 9.00% होते. महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये सन 1962 ते 1999 या कालावधीत महिला सदस्यांचे प्रमाण सरासरी 4.7% होते. हे प्रमाण महाराष्ट्रातील एकूण महिलांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अतिशय कमी आहे.

भारतीय राजकीय प्रक्रियेत आरक्षणाचे धोरण हे दलित व मागास समुहाच्या राजकीय सहभागाचे साधन म्हणून स्विकारण्यात आले होते. याच सुत्रानुसार महिला आरक्षणाची चर्चा घटनासमितीत झाली. स्त्री-पुरुष समानता या तत्वाच्या आधारे सरोजिनी नायडू व इतर महिलांनी त्याला

विरोध केला. १९८० च्या दशकात मात्र स्त्री चळवळ प्रभावी बनली स्त्री चळवळीने हुंडाप्रथा, बलात्कार, कौंटुबीक हिसाचार, स्त्रियांचा दर्जा हे प्रश्न राजकीय परिघात आणले. स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी राजकीय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढला पाहिजे. ही भावना स्त्री चळवळीच्या केंद्रस्थानी आली. या चळवळीने सत्ता, राजकारण आणि राजकीय व्यवस्थेचे पुरुषसत्तावादी विश्लेषण करून महिलांचा राजकीय व्यवस्थेतील सहभाग वाढला पाहिजे अशी मागणी केली. 1993 साली 73 व्या घटनादुरुस्तीद्वारे स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 33% आरक्षण देण्यात आले. त्यामुळे स्थानिक पातळीवर त्यांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण वाढले आहे. लोकसभा व विधानसभांमध्ये महिलांना आरक्षण तरतूद करण्यासंबंधीचे विधेयक प्रलंबित आहे.

भारताने संघराज्य शासन पद्धती स्वीकारताना केंद्रात आणि घटक राज्यातही संसदीय शासन व्यवस्था अंगीकारली आहे. संसदीय शासन व्यवस्थेत तत्वतः विधिमंडळ हे सर्वात शक्तिमान मानले जाते. कारण कायदे व धोरण निर्मितीची सर्वोच्च सत्ता विधिमंडळाकडे असते तसेच कार्यकारी मंडळ विधिमंडळाला जबाबदार असते त्यामुळे विधिमंडळाच्या नियंत्रणाखालीच सत्ता राबवली जाते. त्यामुळे विधिमंडळाच्या सदस्यांना संसदीय लोकशाही व्यवस्थेत निर्णय निर्धारणात महत्व प्राप्त झाले आहे. विधिमंडळाचे सदस्य जनतेचे प्रतिनिधी असल्याने धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करून समाजाला दिशा देण्याचे कार्य त्यांना करावे लागते. राज्यविधी मंडळातील सदस्यांना आमदार असे संबोधण्यात येते. आमदार हेच लोकप्रतिनिधी म्हणून निर्णय प्रक्रियेत सहभागी होत असल्याने त्यांच्या कार्य भूमिकेला संसदीय लोकशाहीत अनन्य साधारण महत्त्व आहे.

लोकशाही राज्यव्यवस्थेत जनता ही सार्वभौम असते. त्यामुळे सार्वभौम अशा जनतेच्या आशा आकांक्षा फलद्रूप करण्याच्या उद्देशाने व प्रशासन चालविण्यासाठी जनकल्याणाचे कायदे करण्याचे काम विधिमंडळाकडे सोपविले आहे. शासनाच्या ध्येयधोरणासंबंधी व विविध योजनासंबंधीचे सर्व विधिमंडळ सदस्य विविध संसदीय आयुधांच्या प्रभावी वापराद्वारे शासनाच्या धोरणाला दिशा देण्याचे काम करीत असतात.

विधिमंडळ केवळ कायदे करण्याचे कार्य करीत नाही. कायदा निर्मितीशिवाय कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवणे, वित्तीय धोरणे ठरविणे, घटनादुरुस्ती व लोकशिक्षणाचे कार्यही विधिमंडळाला पार पाडावी लागतात. चर्चा करणे, कायद्याचा परिणाम अजमावणे, कायदा करणे, त्यात दुरुस्त्या करून त्याला अखेरचा आकार देणे ही विधिमंडळाची कायदेविषयक कामे आहेत.

विधिमंडळाकडून अपेक्षित कार्य समाधानकारक होण्यासाठी संसदेत किंवा विधानसभेत काय लोकप्रतिनिधीचे वर्तन कसे असावे याबद्दल राजकीय विचारवंतांनी चिंतन केले आहे. प्रा. गार्नर यांनी लोकप्रतिनिधींनी आपल्या मतदारसंघातील नागरिकांच्या हितसंबंधाचे रक्षण व संवर्धन करण्यास तत्पर असले पाहिजे. विधीनियम निर्मितीत त्याने आपले योगदान दिले पाहिजे. लोकप्रतिनिधी आपली भूमिका मतदारसंघापुरती सिमीत न ठेवता स्वतःस राष्ट्राचे प्रतिनिधी समजले पाहिजे. अन्य जनप्रतिनिधींशी विचारविनीमय करून सर्व जनहिताची धोरणे व कार्ये सिद्धीस नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली. स्वातंत्र्यानंतर एका वर्षाने मराठवाडा निजामाच्या तावडीतून मुक्त झाला. मराठवाड्याच्या विकासाबाबत नुसती पोकळ हमी दिली जाते. मराठवाड्यात आठ जिल्हे आहेत. त्यातील औरंगाबाद, जालना या दोन्ही जिल्हयात उद्योगाचं जाळं वगळता इतर जिल्हयाचं भकासपण कायम आहे. मराठवाड्यात विकासाचा मोठ्या प्रमाणात अनुशेष आहे. आज अनुशेष २ लाख ३० हजार कोटी रुपयांवर गेला आहे. सिंचन ५५ हजार कोटी, उद्योग सव्वालाख कोटी, कृषी २५ हजार कोटी, कृषी प्रक्रिया उद्योग दहा हजार कोटी, रस्ते ४ हजार कोटी, सहकार १३०० कोटी, आरोग्य व वैद्यकीय शिक्षण १ हजार कोटी, वीज ७ हजार ४१९ कोटी, शिक्षण व पर्यटन १ हजार कोटींचा अनुशेष निर्माण झाला आहे.

मराठवाड्यात सगळयाच राजकीय पक्षाचं वर्चस्व आहे. एकेकाळी मराठवाड्यात काँग्रेसचा एकछत्री प्रभाव होता. पंधरा वर्ष काँग्रेस, राष्ट्रवादीची त्यानंतर शिवसेना-भाजप युतीची सत्ता राज्यात सत्ता होती. या सत्तेच्या काळात मराठवाड्यातील अनेकांना मंत्री मंडळात संधी मिळाली. विशेष करुन स्व. विलासराव देशमुख, अशोक चव्हाण हे अलीकडच्या काळात मुख्यमंत्री होते. त्यापुर्वी शंकरराव चव्हाण, डॉ शिवाजीराव निलंगेकर मुख्यमंत्री होते. मराठवाड्याच्या विकासाचा आढावा घेता राजकीय नेते विकासासाठी विशेष काही करु शकले नाहीत.

मराठवाड्याचा विकास होत नसल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मराठवाडयात शेतीचं क्षेत्र जास्त आहे, सत्तर वर्षात मराठवाड्यात कमीत कमी ४० ते ५० टक्के इतके शेतीचे क्षेत्र सिंचना खाली यायला हवे होते, आज फक्त २० टक्केच्या आतच सिंचनाचं क्षेत्र आहे. शेती सक्षम करण्यासाठी ठोस निर्णय राज्यकर्त्यांनी घेतलेले नाहीत, म्हणुन शेतकऱ्यांची वाईट अवस्था आहे. कर्जबाजारीपणा, नापिकी, शेती मालाला नसलेला योग्य भाव ह्यामुळे राज्यात सर्वात जास्त आत्महत्या ह्या मराठवाड्यात होत आहे. येथे उद्योग नसल्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगारासाठी भटकंती करावी लागते. मराठवाड्यात बेरोजगारी मोठी आहे.

या पार्श्वभूमीवर मराठवाडा या प्रादेशिक विभागातील लोकप्रतिनिधींच्या अर्थात आमदारांच्या कार्याचा अभ्यास करत असताना महिला आमदारांच्या निर्णय प्रक्रियेवर कसा प्रभाव पडतो. महिला आमदारांनी महिलांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी घेतलेल्या भूमिका, केलेले कार्य याबरोबरच एकंदर समाजाच्या विकासासाठी त्यांचे योगदान कसे राहिले आहे हे समजून घेण्याच्या जिज्ञासेतून सदर विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

संशोधन विषयाचे महत्व :

जगातील सर्वच देशात लिंगभेदावर आधारित स्त्री-पुरुष विषमतेची समाज रचना आहे. वैज्ञानिक प्रगतीच्या यशोशिखरावर असणाऱ्या आधुनिक समाजात संपूर्ण स्त्री पुरुष समता आजही अस्तित्वात नाही. भारतासारख्या विकसनशील देशात राजकीय सत्तेची सूत्रे पुरुषवर्गाच्या हातात एकवटलेली दिसतात. फक्त पुरुष वर्गाच्या हाती सत्ता केंद्रीत झाली आणि समाजाचा अर्धा भाग असलेल्या स्त्रिया राजकीय सत्तेपासून दूर राहिल्या तर स्त्रियांचे प्रश्न, समस्या धोरण निर्मितीच्या केंद्रस्थानी येऊ शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर भारतीय लोकशाहीतील महिला अभिजनांच्या

जबाबदारीचा, कार्यकर्तृत्वाचा त्यांच्या निर्णय प्रक्रियेतील भूमिकांचा व निर्णयकर्ते म्हणून त्यांनी घेतलेल्या विविध निर्णयांचा समाज घटकावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

कोणत्याही प्रदेशातील राजकीय प्रक्रिया समजून घेण्यासाठी सामाजिक परिस्थिती व रचना लक्षात घ्यावी लागते त्याशिवाय राजकीय प्रक्रियेच्या स्वरूपाचे आकलन होत नाही. स्त्रियांच्या राजकीय सहभागाचा व विविध स्तरावरील लोकप्रतिनिधी स्त्रियांच्या कार्याचा अभ्यासासाठी समाज व्यवस्थेतील स्त्रियांच्या सामाजिक स्थान व दर्जाचा आढावा घेणे आवश्यक आहे.

पारंपारिक भारतीय समाजात स्त्रियांना दुय्यम व निम्न स्थान देण्यात आले होते. स्त्रियांचे कार्यक्षेत्र फक्त चुल आणि मुल एवढ्यापुरतेच बंदिस्त झाले. समाजव्यवस्थेने व धर्मव्यवस्थेने स्त्रीशिक्षण व स्वातंत्र्यावर अनेक बंधने टाकली. त्यामुळे भारतीय समाजाची अर्धी शक्ती असलेल्या स्त्रिया क्रियाशिल होऊ शकल्या नाहीत.

भारतातील समाजसुधारकांच्या कार्यामुळे स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फुटली. समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित व्हावी व स्त्रियांना विकासाची संधी मिळावी या भुमिकेतून भारतीय संविधानाच्या तिसऱ्या आणि चौथ्या अनुच्छेदात तरतुदी करुन महिलांच्या हक्कांना संवैधानिक दर्जा बहाल केला.

स्त्री-पुरुष समानता तत्वाचा संविधानाने पुरस्कार केला असला तरी व्यवहारिक पातळीवर मात्र स्त्रियांना समानतेचा दर्जा मिळू शकला नाही. निर्णय निर्धारणाच्या लोकशाही प्रक्रियेत स्त्रियांचे प्रतिनिधीत्व अत्यल्प राहिले. त्यामुळे स्त्रियांच्या प्रश्नांकडे पुरुषकेंद्री दृष्टिने पाहून धोरणनिर्मिती झाली. त्याचा परिणाम महिलांच्या स्थितीत फारश्या सुधारणा झाल्या नाहीत. स्त्री-चळवळीच्या माध्यमातून ८० च्या दशकात महिलांना राजकीय प्रक्रियेत सहभाग मिळाला पाहिजे या मागणीने जोर धरला. या पार्श्वभूमीवर ७३ संविधान दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना ३३% आरक्षण दिले. महाराष्ट्र शासनाने २०११ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थात महिलांना ५०% आरक्षण दिले.भारतात स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षणामुळे स्त्रियांसाठी राजकीय भागीदारीचा प्रचंड अवकाश उपलब्ध झाला. स्त्रियांच्या राजकीय सहभागामुळे स्त्रियांसाठी महत्त्वाचे असलेले पाणी, स्वच्छता, शौचालय उभारणी, घरकुल, रोजगार, उपजिवीका, सातबाऱ्यावर नाव, गावातील घरे नवराबायकोच्या संयुक्त नावे अशा प्रश्नांच्या सबंधी धोरण व योजना ठरवितांना स्त्रियांचा विचार केंद्रस्थानी आला. महिलांच्या निर्णय प्रक्रियेतील सहभागाचा हा सकारात्मक परिणाम होता.

महाराष्ट्र विधिमंडळात मराठवाड्यातील महिला सदस्यांच्या कार्याचा अभ्यास करताना महिला सहभागामुळे विकास धोरणात झालेला बदल, महिला नेतृत्वाची क्रियाशीलता, महिला नेतृत्वाच्या मर्यादा, महिला नेतृत्वासमोरील समस्या, राजकीय व्यवस्थेत झालेला गुणात्मक बदल समजून घेणे या भूमिकेतून संशोधकाने प्रस्तुत विषयी निवडला आहे.

संशोधन समस्या

1. लोकशाहीतील स्त्रिया सत्तेतील अत्यल्प प्रमाणातील सहभागामुळे लोकशाही व्यवस्था केवळ मिथक बनली आहे काय?
2. जनतेचे सार्वभौमत्व मान्य करणाऱ्या औपचारिक लोकशाही व्यवस्थेत सत्तेच्या वर्तुळात स्त्रियांना प्रवेश करता येतो का?
3. अभिजन म्हणून कार्य करणाऱ्या स्त्रिया धोरण निर्मिती प्रक्रियेवर आपला प्रभाव पाडू शकतात काय?
4. स्त्रियांच्या राजकीय सहभाग व अभिजन म्हणून राजकीय कार्यक्षमता त्यांना सिद्ध करता आली काय?
5. महाराष्ट्र विधिमंडळातील महिला प्रतिनिधी राजकीय हक्क, जबाबदाऱ्या, कर्तव्य आणि अधिकाराबाबत जागरुक आहेत का? प्रत्यक्ष कार्य करत असताना त्यांना कसा विरोध होतो? त्यांना समाज व कुटुंबाचा पाठिंबा मिळतो का?

संशोधनाची उद्दिष्टे

1) महाराष्ट्र विधिमंडळातील महिला प्रतिनिधित्वाच्या प्रमाणाचा मागोवा घेणे.
2) महाराष्ट्र विधिमंडळाची रचना व कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
3) विधिमंडळाच्या कामकाजात मराठवाड्यातील महिला सदस्यांच्या धोरण निर्मिती व निर्णय प्रक्रियेवरील प्रभावाचा अभ्यास करणे
4) विधिमंडळाच्या अधिवेशनात महिला सदस्यांनी महिलांच्या समस्या, प्रश्न, महिलांवरील अन्याय, अत्याचार, महिला सक्षमीकरण या अनुषंगाने मांडलेल्या भूमिकेचे अध्ययन करणे.
5) मराठवाड्याचा अनुशेष व मागासलेपणा दूर करण्यासाठी महिला सदस्यांच्या विधिमंडळातील भूमिकेचा ऊहापोह करणे.
6) मराठवाड्यातील महिला आमदारांच्या विधिमंडळ बाह्य कार्याचा अभ्यास करणे.
7) मराठवाड्यातील महिला सदस्यांची आपल्या मतदारसंघाच्या विकासासंबंधीची भूमिका व योगदान तपासणे.
8) विधिमंडळातील महिला सदस्यांना विकास कार्ये करतांना येणाऱ्या समस्या व अडचणींचा शोध घेणे.
9) विधिमंडळातील महिला सदस्यांच्या सामाजिक, राजकीय पार्श्वभूमीचा त्यांच्या राजकारणातील सहभागीत्व व क्रियाशीलता यावरील प्रभावाचे अध्ययन करणे
10) विधिमंडळातील महिला सदस्यांमुळे अस्तित्वात आलेले कायदे व धोरणात्मक निर्णय याचा अभ्यास करणे.
11) महिला सदस्या आपल्या जबाबदा-या पार पाडण्यात यशस्वी झाल्या आहेत का याची चर्चा करणे.
12) मराठवाड्यातील महिला सदस्यांच्या विधिमंडळ कामकाजातील सहभागाचा संसदीय आयुधांच्या अनुषंगाने अभ्यास करणे
13) महाराष्ट्र विधिमंडळ यंत्रणा , कामकाज पद्धती, संसदीय प्रथा परंपरा याबाबत महिला

सदस्यांना असलेल्या आकलनाचा अभ्यास करणे.

गृहितके :-

1) महाराष्ट्र विधिमंडळातील महिला सदस्यांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण अल्प आहे.
2) विधिमंडळाच्या कामकाजात महिला सदस्यांचा सक्रिय सहभाग वाढत आहे.
3) विधिमंडळ अधिवेशनात मराठवाड्यातील महिला सदस्यांची उपस्थित कमी आहे.
4) महिलांचे प्रश्न, न्याय हक्क व सक्षमीकरणासाठी मराठवाड्यातील महिला सदस्यांनी सभागृहात सक्रिय भूमिका घेतली आहे.
5) महिला सदस्या आपल्या मतदारसंघाच्या विकासाबाबत सक्रिय भूमिका बजावित आहेत.
6) विधिमंडळात महिला सदस्य संसदीय आयुधांचा प्रभावी वापर करतात
7) पुरुषसत्ताक व्यवस्थेत महिला सदस्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले जात आहे
8) विधिमंडळातील महिला सदस्यांमुळे अनेक विधायक बदल घडून येत आहेत
9) मराठवाड्यातील महिला सदस्य मराठवाडयाचा अनुशेष व मागासलेपणा दूर करण्यात अपयश आले आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत अभ्यासाचे स्वरुप संख्यात्मक व गुणात्मक संशोधन या स्वरुपाचे आहे. हे संशोधन कार्य शास्त्रीय पध्दतीने केले जाणार आहे. संशोधनातील निष्कर्ष हे शास्त्रीय असतील, निश्चित उद्देश साध्य करण्यासाठी नियोजनबध्दरित्या संशोधन केले जाईल. सदरील संशोधनात अनुभवजन्य, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात येईल.

तथ्य संकलन :

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे.

1.ग्रंथालयीन संदर्भ :-

विषयाशी संबंधित कार्यालयीन कागदपत्रे, शासकीय व अन्य संस्थाचे अहवाल, विधिमंडळ कामकाजाचे अहवाल, राजकीय पक्षांच्या घटना व जाहिरनामे, पूर्व संशोधित साहित्य, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, नियतकालिके, शासकीय अहवाल, गॅझेटिअर, स्मरणिका, इंटरनेट इ. स्वरुपाच्या स्त्रोताद्वारे प्राप्त होणाऱ्या माहितीवर भर देऊन तथ्य संकलित करण्यात येतील.

2. क्षेत्र कार्य :-

संशोधनासाठी माहिती संकलित करण्याच्या उद्देशाने प्रश्नावली तयार करुन महाराष्ट्र विधिमंडळाच्या मराठवाड्यातील महिला सदस्यांकडून भरुन घेतली जाईल. तसेच महिला आमदारांच्या मतदारसंघातील निवडक नागरिकांकडून प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलित करण्यात येईल त्याबरोबरच राजकारणासबंधीत निवडक मान्यवर अभ्यासक नेते तसेच महिलांच्या सामाजिक व राजकिय चळवळीत सहभागी लोकांच्या मुलाखती घेण्यात येतील. मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढण्यात येईल.

नमुना निवड:-

संशोधनाच्या तथ्यसंकलनाच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या विधिमंडाळातील मराठवाड्यातील महिला सदस्यांच्या प्रमाणाचा विचार करुन नमुना म्हणून सर्वच महिला सदस्यांची निवड करुन प्रश्नावली या तंत्राचा प्रामुख्याने उपयोग करण्यात येऊन तथ्ये संकलित करण्यात येतील. तसेच महिला आमदारांच्या मतदारसंघातील लोकांकडून निवड पद्धतीतील पद्धतीतील ' स्तरीत यादृच्छिक नमूना निवड पद्धतीचा वापर करून माहिती गोळा करण्यात येईल.

संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र :-

प्रस्तुत संशोधन विषयांतर्गत अध्ययनाचे भौगोलिक क्षेत्र मराठवाडा या प्रादेशिक विभागापुरते सीमित आहे

संशोधन संदर्भकाळ -

समस्येच्या अध्ययनाकरीता इ.स 2004 ते 2019 कालावधी निवडण्यात आला आहे. प्रामुख्याने या कालावधीतील 2004 ची नववी, 2009 ची दहावी व 2014 च्या अकराव्या विधानसभेचा कार्यकाल हा अध्ययनासाठी संदर्भकाळ निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीतील मराठवाड्यातील महिला सदस्यांच्या महाराष्ट्र विधिमंडळातील राजकीय सहभागाचा आणि भूमिकेचे अध्ययन केले जाईल.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधन महाराष्ट्राच्या विधिमंडळातील महिला सदस्यांच्या सहभागाच्या प्रमाणाचे स्पष्टीकरण करेल.

अधिवेशनात महिला सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या पप्रमाणाच, कामकाजात महिला सदस्यांच्या भूमिकांचे स्पष्टीकरण या संशोधनाद्वारे केले जाईल.

संशोधनाची मर्यादा

महाराष्ट्र विधिमंडळातील सदस्यांच्या कार्याचा व भूमिकेचा व्यापक प्रमाणात एकत्रित अभ्यास करणे अशक्य आहे त्यामुळे सदर अभ्यासासाठी महाराष्ट्र विधिमंडळात मराठवाड्यातील महिला सदस्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात येईल. प्रस्तुत संशोधन मराठवाडा या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित असून सदर संशोधनासाठी 2004 ते 2019 ही कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

अध्ययनाशी संबंधित साहित्याचा आढावा :-

महाराष्ट्र विधिमंडळातील सदस्यांच्या राजकीय सहभाग व भूमिकेच्या अनुषंगाने अध्ययने झालेली आहेत. त्याबरोबरच महाराष्ट्र विधिमंडळातील महिला सदस्यांच्या सहभाग व कार्य संबंधी संशोधन व लिखाण झालेले आढळते या अध्ययनामध्ये 'विधिमंडळामधील प्रतिनिधींच्या भरतीचा आकृतीबंध', 'प्रतिनिधी व त्याचा मतदारसंघ यांच्यातील संबंध', 'विधिमंडळातील राजकीय पक्ष', विरोधी पक्ष कार्य भूमिका 'विधिमंडळातील समिती पद्धती', 'विधिमंडळातील सदस्यांच्या भूमिका' इत्यादी विषय आहेत.तसेच भारतीय संसद व राज्य विधिमंडळातील महिला सदस्यांचा राजकीय सहभाग या विषयांवर अध्ययने झाली आहेत. यामध्ये आर.सी मिश्रा यांचे Role of Women in Legislature of India, प्रमिला कपूर लिखित Empowering the Indian Women, व्हि.एम. सुब्रह्मण्यम यांचे Fifty Years of Legislative Council in Maharashtra. (1937-1987), भागवत विद्युत यांचे स्त्री प्रश्नाची वाटचाल, गिरमे, के. टी.लिखित विधानसभा परिचय व कामकाज , जैन अशोक महाराष्ट्राचे शासन व राजकारण हे ग्रंथ या संशोधन विषयाशी निगडित आहेत.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार करता विल्सन एल. बी. यांचा 'Bombay Legislature 1946-1952 : A Study in Structure, Composition and Work', कुळकर्णी ए. जी. यांचा ' A Study of Political Parties in Maharashtra', सिरसिकर व्ही. एम. यांचा 'Sovereigns Without Crowns, Electoral Process in Poona A Study in Parties, Politics and Voters', देशपांडे व्ही. एल. यांचा 'Maharashtra Legislative Assembly : A Behavioural Study', खेकाळे नारायण यांचा 'The Pressure Politics in Maharashtra', इत्यादी अभ्यास या संशोधनासाठी उपयुक्त आहेत.

महाराष्ट्राच्या राजकारणातील विधिमंडळ सदस्यांच्या अध्ययन साहित्याचा आढावा घेतल्यानंतर विधिमंडळाच्या संदर्भातील महिला सदस्यांच्या विशेषता मराठवाड्यातील महिला सदस्यांच्या राजकीय सहभाग व भूमिका या अभ्यासासाठी अजूनही बराच वाव असल्याचे लक्षात येते.

संशोधन आराखडा:

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

संशोधन विषय निवडीमागची भूमिका

संशोधन पद्धती

मराठवाडा – भौगलिक, ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी

प्रकरण दुसरे :- महाराष्ट्र विधिमंडळाची रचना व कार्यपद्धती.

महाराष्ट्र विधिमंडळाचा इतिहास

विधानसभा - रचना, अधिकार व कार्ये

विधानपरिषद – रचना, अधिकार व कार्य

संसदीय आयुधे

प्रकरण तिसरे :- महिलांचा राजकीय सहभाग व मराठवाड्यातील महिला विधिमंडळ सदस्यांचा परिचय

महिलांचा राजकारणातील सहभाग

मराठवाड्यातील महिला आमदारांची सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी (सन 2004 ते 2019

प्रकरण चौथे :- महाराष्ट्र विधिमंडळातील मराठवाड्यातील महिला प्रतिनिधीचे कार्य-अधिवेशनातील सहभाग आणि भूमिका

संसदीय आयुधांचा वापर व महिला सदस्यांची भूमिका कायदे व धोरण निर्मितीवरील प्रभाव

महिलांच्या प्रश्नासंबंधी भूमिका व कार्य

मराठवाडा विभागाच्या विकासात योगदान

प्रकरण पाचवे मराठवाड्यातील महिला विधिमंडळ सदस्यांच्या कार्याचे चिकित्सक विश्लेषण

क्षेत्र कार्यातून प्राप्त माहितीचे विश्लेषण

मराठवाड्यातील महिला सदस्यांच्या कार्याची फलश्रुती

महिला सदस्यांच्या कार्याच्या मर्यादा

प्रकरण सहावे :- सारांश व निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ सूची

1. आगलावे प्रदिप, सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व श्री नागपूर, २००७.
2. इंगोले प्रतिमा, स्त्रिचे भावविश्व आणि आधुनिकता सोनल प्रकाशन, अमरावती.
3. केळकर मीना, भारतीय स्त्री: संकल्पना आणि प्रतिमा, निमित्त पुणे १९९०.
4. खडपेकर विनया, स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९१.
5. गवाणकर रोहिणी, मराठी स्त्रीशक्तीचे राजकारणी रूप, आदित्य प्रकाशन, पुणे 1986
6. पळशीकर सुहास, विरमल नितीन महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे 2004
7. शिंदे सुनिल (संपा.) संसदीय लोकशाहीत विरोधी पक्ष स्थान आणि भूमिका, अरुणा प्रकाशन, लातूर, २०१३.
8. सिरसीकर व.म., आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, २००४
9. व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास महाराष्ट्रातील सनांतर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९५
10. गिरमे के.टी., विधानसभा परिचय आणि कामकाज, श्री विद्या प्रकाशन पुणे, 1983

11. अलेक्झांडर पी.सी., लोकशाही: जाणीव व जोखीम, सोमय्या पब्लिकेशन्स, मुंबई १९९४.
12. भोळे भाल, यशवंतराव चव्हाण राजकारण व साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८
13. शिंदे य.ग., महाराष्ट्र विधानसभा निवडणूक, चंदन प्रकाशन, पुणे, १९९९.
14. गोसावी प्रखर भालचंद्र, संसदीय लोकशाही में विपक्ष की भूमिका, पोइनर पब्लिकेशन्स, जयपुर. १९९७,
15. शुक्ला राजेंद्रप्रसाद, प्रश्नकाल से शुन्यकाल तक, रामप्रसाद एन्ड सन्स, आगरा. २०१२.
16. आचार्य भालचंद्र, संसदीय लोकतंत्र विपक्ष की भूमिका, श्रीमती शशी जैन प्रकाशन, जयपूर, १९९७.
17. काश्यप सुभाष, भारतीय राजनीती और संसद : विपक्ष की भूमिका, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली,
18. तिवारी रजनी, भारत में दलीय अवस्था और संसदीय लोकतंत्र, अर्जुन पब्लिकेशन हाऊस, नई दिल्ली, १९९६.
19. कोठारी रजनी, भारत में राजनीती, ओरिएन्ट लांगमन पब्लिसिंग, न्यू दिल्ली, १९७०.
20. Shinde A.S., The Working the Maharashtra Legislating Assembly.
21. Desai A.R., Politics in Changing India, Deep & Deep Publication, Delhi, १९८८.
22. Usha Thakkar, Mangesh Kulkarni, Politics in Maharashtra, Himalaya Publication House, Bombay, १९९५.
23. Sundarram, Role of Opposition Parties in Indian Politics, Deep and Deep Publication, New Delhi, १९९२.

संशोधक

सरस्वती रावसाहेब कदम.

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री मधुकरराव बापुराव पाटिल खतगावकर, महाविद्यालय

शंकरनगर ता बिलोली जि. नांदेड